## थोडक्यात...


## टेम्पो चालकाच्या खून प्रकरणातील आरोपी अजूनही फरार पोलीसाची शोध मोहीम वेगात



(दशरथ शिंदे/दै.धर्मयोध्दा)

**मानवत-** दारू पिण्यासाठी पैसे न दिल्याचा व जुन्या वादतील राग मनात धरून टेम्पो चालक वैजनाथ पवार यांचा कुदळीने डोख्यात घाव घालून निर्घृण खून करणारा मुख्य आरोपी आरोपी मारोती भगवान चव्हाण वय ४० वर्ष अद्याप तो पोलिसांना सापडलेला नाही या कामी तपास वेगात सुरु असून जिल्हा पोलीस अधीक्षक रवींद्रसिंह परदेशी यांच्या मार्गदर्शनाखाली मानवत पोलिसांच्या सहा पथकाची शोध मोहीम सुरू आहे दिनांक सहा जुलै शनिवार रोजी दुपारी एक वाजण्याच्या सुमारास मानोली फाटा रिंग रोड येथे एका हॉटेलमध्ये सदरील घटना घडली मृत वैजनाथ पवार हे टेम्पो चालून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत होते त्यांच्या हत्यामुळे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. याप्रकरणी मयाताचा पुतण्या अभिषेक मारुती पवार वय २४ वर्ष यांच्या फिर्यादीवरून मारुती चव्हाण यांच्यावर खुनाचा गुन्हा मानवत पोलीस स्टेशन येथे दाखल करण्यात आला आहे परंतु आरोपी खून केल्यापासून आजपर्यंत फरार झालेला असून आज पर्यंत सापडलेला नाही मानवत पोलीस स्टेशनच्या स्थानिक गुन्हे विभागासहित वीस पोलिसांच्या सहा पथक कसून शोध घेत आहेत आरोपी दिसल्यास नागरिकांनी मानवत पोलीस स्टेशनला तात्काळ माहिती द्यावी अशी माहिती प्रभारी पोलीस निरीक्षक संदीप बोरकर यांनी दिली आहे

## महाशिवपुराण कथेनिमित्त आमदार अर्जुन खोतकर यांच्या हस्ते महाआरती संपन्न



(प्रविण जगताप/दै.धर्मयोध्दा)

**जालना-** शहरातील विठ्ठल मंदिर म्हाडा कॉलनी येथे आयोजित महाशिवपुराण पारायण सोहळ्याच्या निमित्ताने विशेष धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या पावन प्रसंगी जालना विधानसभा मतदारसंघाचे आमदार अर्जुन खोतकर यांनी उपस्थित राहून भगवान शंकराची महाआरती केली. कार्यक्रमात भाविकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. पुरोहितांच्या वेदघोष आणि मंत्रोच्चारांनी वातावरण भक्तिमय झाले होते. आमदार खोतकर यांनी भगवान शंकराचे दर्शन घेतले आणि शिवभक्तांसोबत आरतीत सहभाग घेतला.

यावेळी शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख पंडीतदादा भुतेकर, म्हाडा कॉलनी येथील मान्यवर आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. आरतीनंतर सर्व भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

## अतिवृष्टी, निराधार योजना, व घरकुल योजना सारख्या योजनांच्या आढाव्या साठी गुरुवारी विभाग प्रमुखांची पाथरीत बैठक

(गणेश जत्ती/दै.धर्मयोध्दा)

**पाथरी-** विधानसभा मतदार संघातील जनतेच्या विविध प्रश्नी आ राजेश विटेकर यांच्या उपस्थितीत पाथरीत महत्वपूर्ण आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे , गुरुवार दिनांक ३१ जुलै रोजी सकाळी अकरा वाजता पंचायत समिती सभागृहात ही बैठक होणार आहे या बैठकीस पाथरी विधानसभा मतदारसंघातील पाथरी मानवत व सोनपेठ तालुक्यातील तहसिलदार , कार्यकारी अभियंता, मृद व जलसंधारण विभाग परभणी. गट विकास अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, मुख्याधिकारी, नगर परिषद उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम, उपअभियंता, जायकवाडी पाटबंधारे , उप अधिक्षक, भूमिअभिलेख कार्यालय, तालुका आरोग्य अधिकारी, वैदयकिय अधिक्षक, ग्रामीणरुग्णालय , उपअभियंता, वीजवितरण कंपनी , तालुका क्रिडाअधिकारी, तालुका कामगार अधिकारी, एकात्मिक बालविकास अधिकारी, पशुवैदयकिय अधिकारी, व्यवस्थापक, म.रा.प. महामंडळ उपविभाग पाथरी असे तिन्ही तालुक्यातील विभाग प्रमुख असलेले अधिकारी उपस्थित राहणार आहेत, अतिवृष्टी, संजय गांधी व इतर निराधार योजना, घरकुल योजना, पांदन रस्ते, पाणीपुरवठा योजना, रस्ते व पूल, कृषी विभाग, आरोग्य विभाग, कामगार विभाग एस टी महामंडळ, यांच्या योजना व लाभ मिळण्याबाबत नागरिक,शेतकरी यांना मोठ्या प्रमाणावर अडचणी येत आहेत, अशा तक्रारी जनता दरबार व दौऱ्यावर असताना जनतेतून होत आहेत, त्या कामकाजात सुसूत्रतता आणण्यासाठी व जनतेची कामे होण्यासाठी सर्व विभागप्रमुख यांची बैठक घेण्यात यावी अशी सूचना आ राजेश विटेकर यांनी पाथरी उपविभागीय अधिकारी संगीता चव्हाण यांना केली होती त्यावरून ही बैठक होणार आहे,

## निलावंती किसनराव माळकर यांचे निधन



**मंठा–** केंधळी येथील रहिवासी निलावंती किसनराव माळकर यांचे वृद्धापकाळाने (दि २८) रोजी सायंकाळी ६.२०मि वाजता दुःखद निधन झाले. केंधळी येथील स्मशानभूमीत हिंदू पध्दतीने त्यांच्यावर अंतिम संस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात दोन मुले तिन मुली सुना नातवंडे असा मोठा परिवार असून पत्रकार गजानन बबनराव माळकर यांच्या त्या आजी होत्या.

## वारूळाची पुजा करतांना धोपटेश्वर येथिल नवतरूण

(नवनाथ गव्हाण/दै.धर्मयोध्दा)

**बदनापुर -** नागपंचमी हा श्रावण महिन्यातील एक महत्वाचा सण आहे. या दिवशी नागदेवतेची पूजा केली जाते. या दिवशी नागाला दूध पाजले जाते आणि त्याला प्रसन्न करण्याचा प्रयत्न केला जातो आणि पवित्र श्रावण महिन्यात धोपटेश्वर या गावामध्ये अंखड हरिनाम सप्ताह देखिल असतो या मध्ये सात दिवस रोज दुपारी आणि सायंकाळी पंगतीचा (महाप्रसाद) सुद्धा असतो त्यामुळे गावातील वातावरण हे भक्तीमय आनंददायी असते आणि विशेश म्हणजे या गावातील नवतरुणांचा सामावेश हा मोठ्या प्रमाणे असतो



**पाथरी–** तालुक्यातील लोणी बु. येथे प्रति वर्षाप्रमाणे याहीवर्षी श्री सिद्धेश्वर देवस्थान व गावाकऱ्याच्या वतीने नागपंचमी निमित्त भव्य कुस्त्यांचे आयोजन करण्यात आले होते .या कुस्त्यांचा शुभारंभ शिवसेना जिल्हाप्रमुख रवींद्र धर्मे यांच्या उपस्थितीत कुस्तीप्रेमी बन्सी तात्या धर्मे यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. यावेळी रामकिशन धर्मे, अस्विन फुके, सतीश धर्मे, कृष्णा धर्मे, रामप्रसाद धर्मे,रामा धर्मे, बालाजी वाघमारे व अजीम शेख उपस्थित होते. (छाया–गणेश जत्ती)

## एरंडेश्वरात नागपंचमीचा अनोखा उत्सव जेसीबीवर झोके बांधून सण साजरा



(असद शेख/दै.धर्मयोध्दा)

**पुर्णा -** तालुक्यातील एरंडेश्वर गावात यावर्षी नागपंचमीचा सण एका अभिनव आणि विचारप्रवृत्त करणाऱ्या पद्धतीने साजरा करण्यात आला. गावातील युवकांनी पारंपरिक पद्धतीला छेद देत दोन जेसीबी मशीनांना दोर बांधून आकर्षक झोके तयार केले आणि त्याच झोक्यांवर नागपंचमीचा उत्सव उत्साहात साजरा केला.

श्रावण महिन्यातील शुक्ल पक्षाच्या पाचव्या दिवशी साजऱ्या होणाऱ्या नागपंचमीला गावात नेहमीच उत्साहाचे वातावरण असते. यंदा मात्र, गावातील तरुणांनी सर्जनशीलतेचा नवा आयाम जोडत पारंपरिक झाडांऐवजी जेसीबी मशीनचा वापर करून झोके तयार केले. या अनोख्या कल्पनेने गावकऱ्यांसह परिसरातील लोकांचेही लक्ष वेधले.

गावात दोन जेसीबी मशीन उभ्या करून त्यांना मजबूत दोरखंडांनी झोके बांधण्यात आले. या झोक्यांवर गावातील पुरुष,महिला आणि मुलांनी आनंदाने झोके घेतले. नागदेवतेची पूजा, हळद-कुंकवाने रांगोळी, दूध, लाह्या आणि उकडीच्या पुरणाच्या दिंडीचा नैवेद्य अशा पारंपरिक विधींसह हा सण साजरा झाला. मात्र, जेसीबीवरील झोक्यांनी या उत्सवाला आधुनिकतेची झालर जोडली. ''आम्ही काहीतरी वेगळं करावं असा विचार केला. जेसीबीचा वापर करून झोके बांधण्याची कल्पना सर्वांना आवडली आणि सणाचा आनंद द्विगुणीत झाला,'' असे गावातील युवकांनी सांगितले. या उपक्रमामुळे पर्यावरण रक्षणाचा संदेशही देण्यात आला, कारण झाडांच्या फांद्या तोडण्याऐवजी यांत्रिक पर्यायाचा वापर करण्यात आला. हा अनोखा उपक्रम पाहण्यासाठी परिसरातील गावांमधूनही अनेकजण एरंडेश्वरात दाखल झाले होते. गावकऱ्यांनी या सर्जनशीलतेसाठी तरुणांचे कौतुक केले .

## श्री संत सेना महाराज मंदिर येथे श्रावण मास निमित्त प्रवचन कार्यक्रम सोहळा छत्रपती शाहू नगर सेलू



(गणेश सवणे/दै.धर्मयोध्दा)

**सेलू -** श्री संत सेना महाराज मंदिर छत्रपती शाहू नगर सेलू येथे श्रावण मास निमित्त संतसेना मानव जागृती.प्रति वर्ष प्रमाणे याही वर्षी प्रवचन कार्यक्रम.आज दिनांक २८/७/२०२५ रोजी छत्रपती शाहूनगर परिसरात मोठ्या प्रमाणात दिंडी व शोभायात्रा काढण्यात आली होती. शाहू नगर मधील महिला वर्गांनी आपल्या दारासमोर सुंदर अशा रांगोळी काढून दिंडीचे स्वागत व मनोभावे पूजन केले.त्यात सर्व भाविक भक्तांनी आनंदाचा सोहळा मोठ्या उत्साहात साजरा केला.सर्व भाविक भक्त. बालगोपाल.माता भगिनी.संत महात्मे सर्वांनी शोभा यात्रेचा आनंद घेतला.व फुगडी. पावल्या. टिपर्या हा खेळ मोठ्या उत्साहाने सादर केला आहे.

सदरील दिंडी व शोभायात्रा ही छत्रपती शाहूनगर मधील महादेव व दक्षिण मुखी मारुतीरायांचे दर्शन घेऊन दिंडी ही श्री संत सेना महाराज व विठ्ठल रुक्मिणी मंदिर या ठिकाणी संपन्न झाली. त्यानंतर श्री संत सेना महाराज व विठ्ठल रुक्मिणी मंदिर या ठिकाणी सहा ते सात हरिपाठ व सात ते आठ ह भ प नामदेव दळवी महाराज यांच्या अमृतवाणीतून सर्व भाविक भक्तांसाठी संकल्प गाथा प्रवचन करण्यात आले, .या कार्यक्रमाचे आयोजन व नियोजन ह भ प अशोक आनंद महाराज राऊत यांनी केली. तसेच सर्व समाज बांधव व संत सेना महाराज कमिटी व भाविक भक्त यांनी या कार्यक्रमास श्रम घेतले. व कार्यक्रमाची स्वभा वाढवली आहे. तसेच प्रवचन हा कार्यक्रम संपल्यानंतर भाविक भक्तांसाठी फराळ वाटप व चहापाणी करण्यात आली.

यापुढे दररोज सायंकाळी सहा ते सात हरिपाठ व प्रत्येक श्रावण सोमवारी सात ते आठ या वेळेत संत महात्मे यांचे प्रवचन होईल. दिनांक ०४/०८/२०२५ रोजी ह भ प भगवान महाराज परतुर कर यांचे प्रवचन होईल. दिनांक ११/०८/२०२५ रोजी ह भ प दत्तात्रय तळणकर महाराज यांचे प्रवचन होईल.

दिनांक १८/०८/२०२५ रोजी ह भ प वाल्मीक पंडित महाराज यांचे प्रवचन होईल.

तरी सर्व भाविक भक्तांनी व समाज बांधवांनी याचा लाभ घ्यावा असे आव्हान ह भ प अशोक आनंद महाराज राऊत यांनी केले आहे,

## जिंतूर बस स्थानकाची हिंदुहदय सम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ सुंदर बस स्थानक अभियान सन २०२५ अंतर्गत स्वच्छता समितीकडून पाहणी



(सचिन रायपत्रीवार/दै.धर्मयोध्दा)

**जिंतुर -** राप महामंडळातर्फे बस स्थानक स्वच्छता दृष्टिकोनातून राबविण्यात येणाऱ्या हिंदू ह्रदय सम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ सुंदर बस स्थानक अभियान २०२५ अंतर्गत दिनांक २९ ७ २०२५ रोजी जिंतूर आगार व बस स्थानकाची स्वच्छता समितीमार्फत पाहणी करण्यात आली सदर पाहणी करण्याकरिता श्रीमती सपकाळ मॅडम विभाग नियंत्रक रा प जालना व श्री गीते साहेब विभागीय वाहतूक अध्यक्ष रा प जालना तसेच स्थानिक पत्रकार सदस्य म्हणून सचिन रायपत्रिवार व श्री एम ए माजिद जेष्ठ पत्रकार हे स्थानिक पत्रकार समिती सदस्य म्हणून पाहणी मध्ये उपस्थित होते सदर समितीला राप जिंतूर आगाराची व बस स्थानकाची पाहणी करण्याकरिता आगार व्यवस्थापक श्री चव्हाण साहेब श्री सोनवणे साहेब सहाय्यक वाहतूक अधीक्षक राप जिंतूर श्री शरद पाटील साहेब वाहतूक निरीक्षक तसेच विभागीय वाहतूक अधिकारी श्री साळुंखे साहेब आगारातील वाहतूक लिपिक गजानन घुगे प्रल्हाद मुंडे राहुल लिखे मदन मुंडे गुनीरत्न वाकोडे गिराम यांनी सर्वतोपरी मदत केली. सदर पहाणी दरम्यान स्वच्छता समितीने समाधान व्यक्त केले आहे व काही मार्गदर्शक सूचनाही दिलेल्या आहेत सदर समितीचे रा प जिंतूर आगारातर्फे स्वागत आणि आभार व्यक्त करण्यात आलेले आहे

## एकता परिषदेच्या महिला जिल्हा अध्यक्षपदी पायल बुलबुले यांची नियुक्ती




**छत्रपती संभाजीनगर -** नामदार अतुल सावे यांच्या मार्गदर्शनाखाली एकता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष अभिमन्यू उबाळे यांनी पायल जगदीश बुलबुल यांची छत्रपती संभाजीनगच्या एकता परिषदेच्या महिला जिल्हाध्यक्ष म्हणून नियुक्ती केलेली आहे. दि.२९ जुलाई मंगळवार रोजी अभिमन्यू उबाळे यांनी बुलबुले यांना नियुक्ती पत्र देऊन त्यांना पुढील कार्याच्या शुभेच्छा दिल्या. नियुक्ती पत्रात,नामदार अतुल सावे यांच्या मार्गदर्शनाखाली आपली एकता परिषदेच्या महिला जिल्हाध्यक्ष पदी नियुक्ती करण्यात येत असून सदर नियुक्तीचा कालावधी एक वर्षांचा असेल,सर्व महापुरुषांचा विचार आणि शिकवण याचा आपण सक्रियपणे प्रचार व प्रसार कराल तसेच एकता परिषद या संघटनेच्या वाढीसाठी आपण सर्वांना सोबत घेऊन कार्य कराल असा उल्लेख करण्यात आलेला आहे. या नियुक्ती बद्दल पायल बुलबुले यांचे माननीय नामदार अतुल सावे,अभिमन्यू उबाळे,जगदीश बुलबुले यांच्या सह एकता परिषदेचेपदाधिकारी,कार्यकर्ते,तसेच सामाजिक,राजकीय कार्यकर्ते , हितचिंतकासह नातेवाईकांनी अभिनंदन केले.

## श्रावण मासातला पहिला सण नागपंचमी उत्साहात साजरा; बच्चेकंपनीने लुटला झोके खेळण्याचा आनंद

(बाळासाहेब मस्के/दै.धर्मयोध्दा)

**चारठाणा -** नागपंचमी हा श्रावण महिन्यातील पहिला सण ग्रामीण भागात मोठ्या उत्साहात साजरा केला जातो.येथील देशमुख याच्या शेतातील मरीआई च्या पुजेसाठी व दर्शनास महीलाचा मोठ्या प्रमाणात गर्दीच गर्दी झाली होती तसेच येथील वारुळाची पुजा महीलानी मनोभावे करून दर्शन घेत नागपंचमी हा सण उत्साहात साजरा केला. वाढती लोकसंख्या अपुरी जागा ,सतत होणारी वृक्ष तोड यामुळे प्रत्येक गावा गाावातील



वृक्ष कमी होत चाललीत यामुळे नागपंचमी ला झोका खेळण्याचा आनंद कमी होत आहे, परंतु येथील काही नागरिकांनी झाडे लावा झाडे जगवा हा संदेश देत काही झाडे जगवली याला आजच्या दिवशी झोका बांधुन बच्चेकंपनीने झोका खेळण्याचा मनसोक्त आनंद लुटला. श्रावण हा आनंद आणि उत्साह घेऊन येणारा महिना आहे. या महिन्यात ऊनसावल्यांचा लपंडाव चालतो. सर्वत्र हिरवाईने निसर्ग नटलेला असतो. अनेक कवी, लेखकांनी आपल्या साहित्यातून श्रावणाचे वर्णन केले आहे. यावर्षी पावसाचा जोर कमी असल्याने नदी, नाले आणि धरणे अत्यल्प प्रमाणात भरलेले आहेत. पाऊस होईल की नाही याची काळजी शेतकऱ्यांना लागली होती. परंतु मागील पाच दिवसांपासून पावसाची रिपरिप सुरू झाल्याने पिकांना जीवनदान मिळाले आहे. त्यामुळे ग्रामीण भागात नागपंचमी सण हा आनंदाने साजरा झाला आहे. श्रावणातल्या पहिल्या मंगळवार रोजी नागपंचमी हा सण साजरा होत असल्याने महिलांनी घरोघरी नागरुपी वारुळाची मनोभावे पूजा करून दर्शन घेतले. या सणाच्या निमित्ताने विवाहित मुली माहेरी येण्याची प्रथा हळूहळू कमीहोत असल्याचे चित्र दिसून आले. नागपंचमीच्या सणाला महिला व मुलींनी झोके खेळत आनंद लुटला. बच्चे कंपनीही झोके खेळण्यात दंग होऊन गेली होती.

## औढा नागनाथ यात्रेकरूंचे ताडकळस येथे जलपानाने स्वागत गोपाळ कोडिबा आंबोरे यांनी दाखवली सेवा वृत्ती



(वजीर पठाण/दै.धर्मयोध्दा)

**ताडकळस-** दरवर्षीप्रमाणे यंदाही धानोरा काळे येथून औढा नागनाथ या पवित्र स्थळी पायी वारी करणाऱ्या भाविकांनी ''हर हर महादेव'' च्या जयघोषात आपली पदयात्रा सुरू केली. श्रद्धेने ओतप्रोत भरलेल्या या वारीमध्ये सहभागी भाविक मोठ्या भक्तिभावाने पायपीट करत आहेत.

ताडकळस येथे आले असता, येथील सामाजिक कार्यकर्ते गोपाळ कोडिबा आंबोरे यांनी भाविकांसाठी चहा, नाष्टा व पाणीपुरी यांची भरपूर सोय करून त्यांचे मन:पूर्वक स्वागत केले. त्यांच्या या उपक्रमामुळे भाविकांना ऊर्जा मिळाली व पुढील प्रवासासाठी नवीन जोम मिळाला.

गोपाळ आंबोरे यांचे कार्य ग्रामस्थांतून सर्वत्र कौतुकास्पद ठरत असून, या माध्यमातून त्यांनी समाजाप्रती आपली सेवा वृत्ती अधोरेखित केली आहे. यात्रेकरूंनीही त्यांच्या या प्रेमळ स्वागताचे मनापासून आभार मानले.

दैनिक धर्मयोध्दा हे पत्र मुद्रक, प्रकाशक व मालक शिंदे रामेश्वर गणपतराव यांनी प्रविण प्रिटींग प्रेस शॉप नं.१४ सुपर मार्केट, कारेगांव रोड, परभणी ४३१ ४०१ (महाराष्ट्र) येथे छापून धर्म योध्दा कार्यालय, विकास नगर, कारेगांव रोड, परभणी ४३१ ४०१ (महाराष्ट्र) येथुन प्रसिध्द केले. **संपादक–शिंदे रामेश्वर गणपतराव**

DHARMA YODDHA Daily Publisher, Printer, Owner by- Shinde Rameshwar Ganpatrao, Printed at Pravin Printing press Shop No 14 Super Market Karegaon Road Parbhani 431401 (M.S) And Published A√t Dharmayoddha Karyalaya Vikas Nagar,Karegaon Road Parbhani. 431401 (M.S) Editor By - Shinde Rameshwar Ganpatrao